**समता दिंडी काढत जिल्हा परिषदेने साजरी केली राजर्षी छत्रपती शाहू महाराज जयंती**

-----------------------------

**दिंडीतून विद्यार्थांनी दिला सामाजिक न्यायाचा संदेश**

**ठाणे दि २६ जून २०१९ :** राजर्षी छत्रपती शाहू महाराज जयंती आणि सामाजिक न्याय दिनाचे औचित्य साधत ठाणे जिल्हा परिषद समाजकल्याण विभागाच्या वतीने चित्ररथासह समता दिंडीचे आयोजन करण्यात आले होते. आज सकाळी ठाणे जिल्हा परिषदेच्या अध्यक्ष मंजुषा जाधव आणि मुख्य कार्यकारी अधिकारी हिरालाल सोनवणे यांच्या हस्ते चित्ररथात असणाऱ्या राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी दिंडीच्या माध्यमातून शाळकरी मुलांनी सामाजिक न्यायाचा संदेश दिला.

जिल्हा परिषद आवारातून शाळकरी मुलांसह निघालेली समता दिंडी जिल्हाधिकारी आवरापर्यंत काढण्यात आली. यावेळी विद्यार्थांनी विविध घोषणा दिल्या. या समता दिंडीत गौतम माध्यमिक हिंदी विद्यालय, जिल्हा परिषद माध्यमिक कन्याशाळा, मोह विद्यालय, शिवसमर्थ विद्यालय आदि शाळा सहभागी झाल्या होत्या. तत्पूर्वी मुख्य कार्यकारी अधिकारी हिरालाल सोनवणे यांनी श्रीफल वाढवून चित्ररथ फेरीचे उद्घाटन केले.

याशिवाय कोर्ट नाका येथील टाऊन हॉल येथे राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या जीवन कार्यावर श्री.देशमुख यांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी समाज कल्याण अधिकारी सलीमा तडवी, इतर अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते

------------------

**राजर्षी छत्रपती शाहू महाराजांना अभिवादन**

जिल्हा परिषदेच्या यशवंतराव चव्हाण सभागृहात राजर्षी छत्रपती शाहू महाराज जयंती निमित्त त्यांच्या प्रतिमेचे पूजन करून अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी ब. भि. नेमाने यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी उप मुख्य लेखा व वित्तधिकारी मयूर हिंगाने यांनी अभ्यासपूर्ण शैलीत शाहू महाराजांचे जीवनकार्य

उलगडले. या प्रसंगी जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी डॉ. लक्ष्मण पवार, इतर विभागाचे अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते.

